महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २२३ वे | दिनांक : ०७/०८/२०२६ | वार : शनिवार

## कोट्यवधींचा गोसेखुर्द कालवा वर्षभरातच भेगाळला; वडेट्टीवारांचा कंत्राटदार-अभियंत्यांना दणका!



**चंद्रपूर :** ब्रम्हपुरी तालुक्यातील तोरगाव परिसरातून जाणाऱ्या गोसेखुर्द उजव्या कालव्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे कोट्यवधी रुपयांचा सार्वजनिक निधी वाया जात असल्याचे चित्र समोर आले आहे. अवघ्या वर्षभरातच कालव्याला अनेक ठिकाणी भेगा पडल्या असून काही ठिकाणी बांधकाम खचले आहे. त्यामुळे भर हंगामात शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत सिंचनाचे पाणी पोहोचण्यास विलंब होत असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते तथा आमदार विजय वडेट्टीवार यांनी घटनास्थळी भेट देऊन कालव्याची पाहणी केली. पाहणीदरम्यान निकृष्ट दर्जाचे बांधकाम उघडकीस आल्यानंतर त्यांनी संबंधित कंत्राटदार आणि सिंचन विभागातील अभियंत्यांना चांगलेच धारेवर धरले. दोन वर्षापासून गोसेखुर्द उजव्या कालव्यावरील 'क्रिटिकल पॅचेस'च्या बांधकामासाठी एम.के.एस., बी आयपीएल, सरला या कंपनीला 235 कोटींचे कंत्राट देण्यात आले होते. मात्र काम पूर्ण करण्याची मुदत संपूनही आतापर्यंत अवघे 15 टक्के कामच पूर्ण झाले आहे. त्यातही झालेल्या कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे पाहणीत स्पष्ट झाल्याने संपूर्ण प्रकरणावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.कामाच्या संथ गतीमुळे आणि पाणी वेळेवर न मिळाल्याने यापूर्वी संतप्त शेतकऱ्यांनी कार्यकारी संचालकांच्या कार्यालयावर धडक देत आंदोलन केले होते. तरीही प्रशासनाने ठोस पावले न उचलल्याने शेतकऱ्यांचा रोष अधिकच वाढला आहे. संबंधित कालव्याच्या पाहणीवेळी आमदार वडेट्टीवार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, कंत्राटदार आणि संबंधित अभियंत्यांच्या संगनमतामुळेच हे काम निकृष्ट दर्जाचे होत असून शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्याशी खेळ केला जात आहे. जनतेच्या पैशाची उधळपट्टी करणाऱ्यांना कोणतीही माफी मिळणार नाही. तसेच त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकारी, अभियंते आणि संबंधित कंत्राटदारावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. निकृष्ट काम करणाऱ्या एम.के.एस. कंपनीला तातडीने काळ्या यादीत टाकण्यात यावे, अशीही मागणी त्यांनी केली. यावेळी कार्यकारी अभियंता सुहास मोरे यांच्यासह सिंचन विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. वडेट्टीवार यांनी अधिकाऱ्यांकडून कामाचा सविस्तर आढावा घेत तातडीने दुरुस्तीची कामे पूर्ण करून शेतकऱ्यांना अखंड पाणीपुरवठा करण्याचे निर्देश दिले. गोसेखुर्दसारख्या महत्त्वाकांक्षी सिंचन प्रकल्पात निकृष्ट दर्जाचे काम, विलंब आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हजारो शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. असेही विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार म्हणाले. कालवा पाहणीच्या वेळेस काँग्रेस तालुका अध्यक्ष खेमराज तिडके,उपनगराध्यक्ष डॉ. नितीन उराडे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमुरकर,शहराध्यक्ष हितेंद्र राऊत, सुधीर शिउरकर, संजय राऊत, विनोद बर्ले,यांचेसह काँग्रेस पदाधिकारी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## मोदींची सदिच्छा भेट; तटकरेंची गडकरींकडे टोलमुक्तीची मागणी



**मुंबई :** संसदीय अधिवेशनादरम्यान मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांवर राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे खासदार सुनील तटकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह 10 केंद्रीय मंत्र्यांची भेट घेतली. या वेळी मुंबई-गोवा महामार्गाचे रखडलेले काम आणि अन्यायकारक टोलच्या मुद्द्यावर त्यांनी नितीन गडकरींचे लक्ष वेधले असून, यावर गडकरींनी तातडीने कारवाईच्या सूचना दिल्या आहेत.

सुनील तटकरे म्हणाले, संबंध अधिवेशनात लोकसभा मतदारसंघातील अनेक विषय मांडता आले नाहीत. त्यामुळे उपलब्ध असलेल्या वेळेत काही जे महत्त्वाचे प्रश्न जे आहेत, त्या संबंधातील मंत्र्यांना भेटलो. जवळपास 10 मंत्र्यांना मी भेटलो. माननीय पंतप्रधान मोदींची भेट झाली ती सदिच्छा भेट आणि मार्गदर्शनासाठी होती.

पुढे बोलताना सुनील तटकरे म्हणाले, प्रामुख्याने समस्त कोकणवासीयांना भेडसावणारा जो प्रश्न आहे, मुंबई-गोवा महामार्गच्या संदर्भातला आणि त्या रस्त्यावर सुरू असलेला टोल. त्याबद्दल रस्त्याचे रखडलेले काम असताना जे टोल सुरू आहेत, त्या संदर्भात नितीन गडकरी यांची भेट घेतली. यात त्यांनी तातडीने काही सूचना दिल्या आहेत.

सुनील तटकरे म्हणाले, केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चव्हाण यांची देखील मी भेट घेतली. त्यात विशेषतः कोकणात ऑर्गनिक फार्मिंग आणि ॲग्रिकल्चर क्रॉप्स या संदर्भातले काही विषय होते. त्याच सोबत दत्तात्रय भरणे यांच्यासोबत चर्चा झाल्यानंतर आपल्याकडील भाजीपाला आणि फळं यांच्या उत्पादनाचे क्लस्टर काढण्यासाठी त्याला नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळाच्या दृष्टिकोनातून निधी मिळावा, याबाबतीत देखील चव्हाण यांच्याशी चर्चा झाली. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत भारत सरकारचे पत्र राज्य सरकारकडे देण्याची तरतूद केली आहे.

तिसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 720 किमीच्या किनारपट्टीमध्ये सागरमाला 2 अंतर्गत काही हजार कोटींचा निधी मागवला आहे. मंत्री नितेश राणे यांच्याशी माझी चर्चा झाली. यात सागरमाला 2 मध्ये जे काही प्रकल्प प्रस्तावित आहेत, या संदर्भात माझी सोनवाल यांच्याशी भेट झाली, अशी माहिती सुनील तटकरे यांनी दिली आहे.

सुनील तटकरे पुढे बोलताना म्हणाले, आपल्याकडे काही अल्पसंख्यांक जिल्हे म्हणून घोषित झाले आहेत. या संदर्भात मी किरेन रिजीजू यांची भेट घेतली आहे. त्यांना निवेदन देऊन माझ्या मतदारसंघातील जो काही प्रस्ताव मांडला आहे, त्याला मान्यता देण्याची विनंती केली आहे. या संदर्भातील नवीन योजना लवकरच येत आहे.

तसेच प्रशांत किशोर यांनी सुनेत्रा पवार यांची भेट घेतली होती. या संदर्भात प्रश्न विचारला असता सुनील तटकरे म्हणाले, प्रशांत किशोर यांनी सुनेत्रा वहिनी यांची औपचारिक भेट घेतली आहे. त्यांची सल्लागार म्हणून नेमणूक केली असती तर मला समजले असते. पण तसे काही नाहीये. तसेच शरद पवार साहेबांना एकेका जिल्ह्यातील 10-12 सदस्यांची नावे माहीत होती. अजितदादा सुद्धा अनेकांना ओळखत होते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष रुजण्यासाठी सरव्हे केला जातो. यात काही वावगे नाही. आता आम्ही सगळे त्याच पद्धतीने काम करत आहोत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ ऑगस्ट २०२६


## नवनिर्वाचित शहर मंत्री म्हणून समर्थ कुंभार यांची निवड; उर्वरित कार्यकारिणीही घोषित




**उमरगा (प्रा.नागसेन कांबळे) :** येथील आदर्श महाविद्यालयाच्या सभागृहात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) उमरगा यावर्षीच्या शहर कार्यकारिणीची घोषणा उत्साहपूर्ण वातावरणात व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आली. विद्यार्थी हित, शैक्षणिक प्रश्न, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रहिताच्या विविध विषयांवर प्रभावीपणे कार्य करण्यासाठी सन २०२६-२७ या वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.यामध्ये नवनिर्वाचित शहर मंत्री म्हणून समर्थ कुंभार यांची अभाविप उमरगा शहर मंत्री म्हणून निवड करण्यात आली, संघटन कौशल्य,अनुशासन आणि नेतृत्वगुण लक्षात घेऊन त्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.तर नामदेव शिंदे आणि ऋतुजा शिंदे यांची शहर सहमंत्री म्हणून निवड करण्यात आली. तसेच याशिवाय उर्वरित शहर कार्यकारिणीचीही घोषणा करण्यात आली.या कार्यक्रमास लातूर विभाग संयोजक यश आरीकर, लातूर विभाग संघटन मंत्री महेश भवर, धाराशिव जिल्हा संयोजक राजेश कवडे, धाराशिव दक्षिण भाग संयोजक पंकज बेलकोणे, उमरगा तालुका संयोजक धनेश जाधव तसेच धाराशिव शहर विद्यार्थी विस्तारक पवन नरवडे यांची प्रमुख उपस्थिती होती.नवीन कार्यकारिणीची घोषणा होताच उपस्थित कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उत्स्फूर्त स्वागत व अभिनंदन केले. यावेळी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि राष्ट्रीय प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याचा तसेच विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.यावेळी शहरातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी काळात अभाविपच्या माध्यमातून विद्यार्थीहिताचे विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## यशासाठी अभ्यासाचे नियोजन, चारित्र्य बांधणी आवश्यक




**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात अकरावी व बारावी कला शाखेचा पालक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्यात विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यात सुसंवाद साधत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती व सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या डॉ. कविता प्राशर म्हणाल्या, विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यातील सुसंवाद व समन्वय हा विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी शिस्त, नियमित अभ्यास, वेळेचे नियोजन आणि सकारात्मक दृष्टिकोन अंगीकारून यश संपादन करावे.प्रमुख मार्गदर्शक मनीषा पाटील यांनी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास, नियमित उपस्थिती, अभ्यासाचे प्रभावी नियोजन, परीक्षेची तयारी, करिअरच्या विविध संधी तसेच विद्यार्थ्यांच्या घडणीत पालकांची भूमिका या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले.प्रारंभी डॉ. चंद्रकांत धोत्रे यांनी पालक मेळाव्याची उद्दिष्टे स्पष्ट करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांनी परस्पर सहकार्य व संवादातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रित प्रयत्न करावेत, असे त्यांनी नमूद केले.यावेळी सत्यप्रिय शृंगारे हिने स्वागतगीत सादर केले. कला शाखेतील प्राध्यापकांचा परिचय प्रा. गणेश जाधव यांनी करून दिला.कार्यक्रमादरम्यान पालकांशी मुक्त संवाद साधण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक आणि शिक्षकांनी संयुक्तपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.या प्रसंगी डॉ. मोहिनी रायबागकर, डॉ. रामेश्वरी कमटम, प्रा. स्मिता निर्मल, प्रा. ऋतुराज भांदर्गे, प्रा. सुरभी दायमा यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रमोद अवचार यांनी केले, तर डॉ. मंगल मुळे यांनी आभार प्रदर्शन केले.

## आयुष्मान भारत मिशनच्या महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांची आरोग्य विद्यापीठास भेट



**नाशिक :** आयुष्मान भारत मिशनच्या महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. यावेळी विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते यांच्याशी त्यांनी संवाद साधला.यावेळी आयुष्मान भारत मिशनच्या महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी सांगितले की, शासनाची एकत्रित आयुष्मान भारत -प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना सर्वांसाठी अत्यंत उपयोगी आहे. विद्यापीठाच्या ज्या संलग्नित महाविद्यालयांनी या योजनेचा प्रभावी पध्दतीने प्रसार करुन जास्तीत जास्त लोकांना लाभ घेता येईल याकडे अधिक व्यापकरित्या कार्य केले जाईल. आयुष्मान भारत मिशनव्दारा लोकांना आरोग्याच्या चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते यांनी सांगितले की, विद्यापीठाच्या विविध उपक्रमांव्दारे आरोग्य विषयक जनजागृती व आयुष्मान भारत मिशनचा मोठया प्रमाणात प्रचार करण्यासाठी विद्यापीठाकडून विविध उपक्रम राबविण्यात येतील असे त्यांनी सांगितले.या भेटीप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, नाशिकचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतिष शिंपी, जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागुल, जिल्हा रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप सुर्यवंशी, ज्येष्ठ पत्रकार श्री. महेंद्र महाजन आदी उपस्थित होते.


### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ ऑगस्ट २०२६


## स्वच्छता अभियान

गाव करूया सुंदर छान
नको कुठे दुर्गंधी घान
जनहिताचा वसा घेऊनी
राबवूया स्वच्छता अभियान

रोगराईचे जंतू असतात
आजार फैलविण्यास सज्ज
जेव्हा घराभोवती असते
घाणीचे सदा साम्राज्य

गाव स्वच्छ करण्याचा
उचलूया आपण विडा
तेव्हाच कुठे दूर जाईल
रोगराईची पिडा

नको गावात हागनदरी
नको सांडपाण्याचे नाव
प्रत्येकाने संडास बांधूनी
बनवूया आदर्श गाव

सर्व मिळूनी आपण
करूया घाणीचा नायनाट
तेव्हाच कुठे उगवेल
सुंदर व स्वच्छ पहात



**- कल्पना चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**

# नालंदा बुद्ध विहारास तथागत बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व पेरियार यांच्या प्रतिमांची सदिच्छा भेट



**छत्रपती संभाजीनगर :** नागरी मूलभूत हक्क अभियानाचे नेते प्राचार्य सुनील वाकेकर यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या भेटीदरम्यान सिल्लोड येथील नालंदा बुद्ध विहारासाठी तथागत भगवान बुद्ध, बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समाजसुधारक ई. व्ही. रामास्वामी पेरियार यांच्या आकर्षक फोटो फ्रेम्स सदिच्छा भेट म्हणून प्रदान करण्यात आल्या. यावेळी प्राचार्य सुनील वाकेकर यांनी समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्यांचा प्रसार करण्यासाठी तथागत भगवान बुद्ध, बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पेरियार यांचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी व दिशादर्शक असल्याचे सांगितले. नालंदा बुद्ध विहारात या प्रतिमा समाजप्रबोधन, वैचारिक जागृती आणि परिवर्तनवादी चळवळीच्या प्रेरणास्थान ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी सिल्लोड येथील ज्येष्ठ नेते डॉ. प्रकाशराव बिऱ्हाडे, सामाजिक कार्यकर्ते मिलिंद दांडगे, अमित अरके, कडुबा जगताप, डॉ. लोकेश कांबळे, दिपक पगारे तसेच सिल्लोड येथील इतर कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी या वैचारिक आणि सामाजिक उपक्रमाचे स्वागत करत प्राचार्य सुनील वाकेकर यांच्या कार्याचे कौतुक केले.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


# तीस हजार विद्यार्थ्यांशी लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी संवाद साधला



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** इयत्ता चौथी बालभारतीच्या पाठ्यपुस्तकातील प्रसिद्ध लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी त्यांची " कौतुकाची थाप " या प्रेरणादायी आणि संस्कारक्षम पाठाच्या माध्यमातून छत्रपती संभाजीनगर येथील दहा शाळेत, जालना येथील सात शाळेत, तर बीड येथील सात शाळेत चोवीस शाळेतील जवळजवळ तीस हजार विद्यार्थ्यांची आणि आठराशे शिक्षक शिक्षिकांशी " कौतुकाची थाप " या पाठावर प्रत्यक्ष संवाद साधलेला आहे. लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेची गोडी निर्माण व्हावी आणि भविष्यात विद्यार्थ्यांमधून कवी-लेखक निर्माण होतील असा हा नाविन्यपूर्ण उपक्रमाचा हेतू आहे. मराठवाड्याचे शिक्षक आमदार विक्रमजी काळे साहेब यांनी स्व. अजितदादा पवार यांच्या जयंती निमित्ताने व विक्रमजी काळेसाहेब यांच्या वाढदिवसा निमित्ताने या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करून प्रत्यक्ष शिक्षक आमदार विक्रमजी काळेसाहेब हे स्वतः प्रत्येक शाळेत हजर होते. याप्रसंगी राष्ट्रवादी प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष तथा कवी मनोज खुटे यांच्या सुपीक संकल्पनेतून हा नावीन्यपूर्ण उपक्रम संपूर्ण मराठवाड्यात राबविण्यात येत आहे. यासाठी राष्ट्रवादी माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप विखे ,वाहेद शेख , श्रीमती आशा डांगे, रमाकांत छडीदार, अकिल पठाण आणि अन्य कार्यकर्ते यांचे सहकार्य लाभले आहे.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ ऑगस्ट २०२६

## बालस्नेही महाराष्ट्र घडविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे - ॲड. संजय विष्णू पुराणिक




**बीड (भगवंत पाळवदे) :** महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष ॲड. संजय विष्णू पुराणिक तसेच आयोगाच्या सदस्यांनी बुधवारी बीड येथील एचआयव्ही बाधित बालकांच्या विशेष बालगृहाला भेट देऊन तेथील सुविधा व व्यवस्थेची पाहणी केली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात दिवसभर बाल हक्क संरक्षणाशी संबंधित प्रलंबित प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली. एकूण १८ प्रकरणांवर सुनावणी झाली असून त्यापैकी १० प्रकरणे निकाली काढण्यात आली, तर उर्वरित प्रकरणांबाबत आवश्यक निर्देश देण्यात आले. सुनावणीनंतर आयोगाने जिल्ह्यातील विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.यावेळी आयोगाच्या सचिव (अतिरिक्त कार्यभार) वंदना पु. जैन, सदस्य गीतांजली बाळाजी बुटी, शुभांगी संजय तांबट, संजय निळकंठराव लहाकेपाटील, अतुल आनंदराव देसाई, प्रवीण संजाबराव भुजाडे, मिलन देवेंद्र जंगम, कनिष्ठ काळजी वाहक अजय लोंढे, परिविक्षा अधिकारी उज्वला होवाल, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शेख फारुख तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.यावेळी बोलताना अध्यक्ष ॲड. पुराणिक यांनी बालस्नेही महाराष्ट्र घडविण्यासाठी बालहक्क संरक्षणाशी संबंधित सर्व विभागांनी प्रभावी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता व्यक्त केली. बैठकीत पॉक्सो प्रकरणांतील अडचणी, मनोधैर्य योजनेतील प्रलंबित प्रकरणे, महिला हेल्पलाईन १०९८ व आपत्कालीन सेवा ११२ यांच्यातील समन्वय, बालविवाह प्रतिबंध, विशेष बाल पोलीस पथक, 'पोलीस काका-दीदी' उपक्रम तसेच बाल संरक्षण समित्यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला.शाळा व महाविद्यालयांमध्ये सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण, मुलींसाठी पिंक रूम, कार्यान्वित 'सखी-सावित्री संवाद पेटी', स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, सुरक्षित वाहतूक व सुरक्षाविषयक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच बीड जिल्ह्यातील स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी शिक्षण हमी कार्डाचा वापर, स्थलांतरित मुलांचा पाठपुरावा, बालविवाह रोखल्यानंतर संबंधित मुलींच्या शिक्षणावर लक्ष ठेवणे तसेच सलग अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची गृहभेट घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यावर भर देण्यात आला.बालमजुरी प्रतिबंधासाठी कामगार विभागाने सतर्क राहावे, स्थलांतरित कामगारांच्या मुलांसाठी हंगामी वसतिगृहे उपलब्ध करावीत तसेच अनाथ बालकांना आवश्यक कागदपत्रे व अनाथ प्रमाणपत्र तातडीने उपलब्ध करून द्यावीत, अशा सूचनाही आयोगाने दिल्या. राज्यातील 'बालस्नेही पंचायत' अभियानासाठी निवडलेल्या १०० गावांमध्ये बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील पिंपळगाव, बीड तालुक्यातील बोरफडी आणि धारूर तालुक्यातील हिंगणी या गावांची निवड झाल्याची माहितीही यावेळी देण्यात आली

## 'महाराष्ट्र माझा' कविता विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात



**वैजापूर (प्रतिनिधी) :** प्रसिद्ध, लेखक,कवी ना.वि.पठारे यांच्या कवितेचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश झाला आहे. बी.ए. तृतीय वर्षाच्या अभ्यास पत्रिका आठवी, सत्र सहावे साठी 'मराठवाड्यातील कविता' यामध्ये कवी नामदेव विठ्ठल पठारे (सेवा निवृत्त प्राथमिक शिक्षक शांती सदन प्राथमिक शाळा, बोरसर )यांच्या 'वेदनांचे वेद ' या कवितासंग्रहातील 'महाराष्ट्र माझा' ही महाराष्ट्राच्या वैभवाचे दर्शन घडविणारी, मातृभूमी बद्दल अभिमान, महाराष्ट्राचे संस्कृती,शौर्य ऐतिहासिक वारसा व मानवतेचे मूल्य आचरणात आणण्याची प्रेरणा देणारी ही कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात जून 2026 पासून समाविष्ट करण्यात आली आहे.त्यांनी 46 वर्षापासून मराठी साहित्य क्षेत्रात दर्जेदार लेखन केलेले असून तीस पेक्षा अधिक कवितासंग्रह प्रकाशित आहेत. कथा, कादंबरी, नाटक, भीमगीते, पोवाडे, शेरोशायरी, आत्मकथन आदिलेखन त्यांनी केले आहे. एका उपेक्षित कवीला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला. या उल्लेखनीय यशाबद्दल साहित्यिक,शैक्षणिक व सामाजिक स्तरातून त्यांचे अभिनंदन होतआहे. ना. वि. पठारे यांच्या साहित्याचा परिचय पुढील प्रमाणे कवींचा परिचय संपूर्ण नाव: नामदेव विठ्ठल पठारे जन्मदिनांक : 1सप्टेंबर 1949 जन्मगाव: बोरसर शिक्षण : एम ए डी एड (समाजशास्त्र ) व्यवसाय: प्राथमिक शिक्षक ( सेवानिवृत्त) प्रकाशित काव्यसंग्रह -वेदनांचे वेद, गावातील गाणी, भीमायन,संत संगत, राजकारणातील रणधुमाळी, वनांचं वरदान, बळीराजाची बरमळ, बालोद्यान, महाराष्ट्रातील महामानव, सूर्याची सावली, शिवरायांची शिवसृष्टी, माझी माय, माहेरचा आहेर, परपंच पाचटातला, दलितांची दशा आणि दिशा, माझा बाप,माणसातला माधव, वैजापूरचे वैभव, काळ्या आईची किंकाळी, गीत गुंजन, जिजाऊ महामाता महाराष्ट्राची,छावा शिवसूत संभाजी,आर्त आवाज आईच्या गर्भातील, उत्तराखंड कर्मकांड, सुबोध संजीवनी, आंबेडकरांची अमृतवाणी, चकोर चांदणं बौद्ध पौर्णिमेचं,विद्रोही वादळातील वटवृक्ष, गारांचा मारा, अनाथांचा नाथ गोपीनाथ व सात कवितासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर......( अप्रकाशित नाटके )............ 14 नाटकांचे लेखन इथे वाहिले अश्रू सतीचे, पती माझा सभापती,सह्याद्रीच्या कुशीत, जहरी नागिन अर्थात खुणाचा बदला ( वगनाट्य ),फिर्याद, इज्जतीचा सवाल, रयतेचा राजा,मानी मनाची रमणी, बलिदान, बेबंद राजा, चांदण्यात न्हाली रात्र, न्याया घरी अन्याय,सासू सवाई सून,कथासंग्रह - गावगाडा.कादंबरी लेखन - तमासगीर,दामू मास्तर, महामानव,-आत्मकथन आयुष्याचा अग्नीकुंड अवांतर..... लेखन, भीम गीते,भावगीत, लोकगीत,विरहगीत, पोवाडे, पाळणे, कहानी,शेरोशायरी असे एकूण तीन हजार पाचशे गीत लेखन......आज पर्यंत प्राप्त पुरस्कार राज्यस्तरीय साहित्य गौरव पुरस्कार - समता कला विकास अकादमी औरंगाबाद तर्फे, पु ल देशपांडे स्मृती पुरस्कार, महाराष्ट्र सांस्कृतिक कला अभियान वैजापूर यांच्यातर्फे महात्मा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, इंडियन बहुजन टीचर असोसिएशन महाराष्ट्र राज्य, आदर्श शिक्षक पुरस्कार- संस्थेतर्फे राज्यस्तरीय महाकवी वामनदादा कर्डक आदर्श लेखक पुरस्कार, साहित्य भूषण पुरस्कार, राज्यस्तरीय- श्री ज्ञान सरस्वती सेवाभावी बहुउद्देशीय संस्था वैजापूर, उत्कृष्ट साहित्य लेखन पुरस्कार - तिसरे साने गुरुजी साहित्य संमेलन बोरसर येथे प्राप्त, राज्यस्तरीय आदर्श लेखक पुरस्कार प्राप्त, समता कलाविकास अकादमी वैजापूर यासह एकूण 26 पुरस्कारांनी सन्मानित.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०८ ऑगस्ट २०२६

# आदिवासी अस्मितेचा गौरव : शाश्वत विकासाचे खरे शिल्पकार- डॉ. राजेंद्र बगाटे

जगभरातील आदिवासी समाजाच्या अस्तित्वाचा, त्यांच्या सांस्कृतिक अस्मितेचा, पारंपरिक ज्ञानाचा आणि मानवी हक्कांचा गौरव करण्यासाठी दरवर्षी ९ ऑगस्ट हा दिवस 'जागतिक आदिवासी दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने १९९४ मध्ये या दिवसाला अधिकृत मान्यता दिल्यानंतर जगभरात आदिवासी समाजाच्या प्रश्नांबाबत जागरूकता निर्माण करण्याचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात सुरू झाले. हा दिवस केवळ औपचारिक शुभेच्छांचा किंवा सांस्कृतिक कार्यक्रमांचा नसून आदिवासी समाजाने मानवजातीला दिलेल्या अमूल्य योगदानाचा सन्मान करण्याचा, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याचा आणि विकासाच्या प्रक्रियेत त्यांचा समान सहभाग सुनिश्चित करण्याचा दिवस आहे. आधुनिक विकासाच्या शर्यतीत अनेकदा दुर्लक्षित राहिलेल्या या समाजाने हजारो वर्षांपासून निसर्गाशी सुसंवाद साधत पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन, सामुदायिक जीवन आणि शाश्वत विकासाची जीवनशैली जपली आहे. त्यामुळे आज हवामान बदल, पर्यावरणीय असंतुलन आणि नैसर्गिक संसाधनांच्या ऱ्हासाच्या पार्श्वभूमीवर आदिवासी समाजाचा जीवनदृष्टिकोन संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी ठरत आहे.भारत हा सांस्कृतिक विविधतेचा देश असून या विविधतेमध्ये आदिवासी समाजाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतातील अनुसूचित जमातींची संख्या शेकडोमध्ये असून त्यांच्या भाषा, लोकसंस्कृती, परंपरा, श्रद्धा, सामाजिक व्यवस्था आणि जीवनपद्धती या अत्यंत समृद्ध आहेत. भील, गोंड, संथाल, मुंडा, वारली, कोरकू, कातकरी, महादेव कोळी, कोकणा, माडिया, कोलाम, हलबा, आंध अशा विविध जमाती भारताच्या विविध भागांत वास्तव्यास आहेत. महाराष्ट्रात नंदुरबार, धुळे, पालघर, नाशिक, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, अमरावती, यवतमाळ, हिंगोली आणि इतर अनेक जिल्ह्यांमध्ये आदिवासी समाज मोठ्या प्रमाणावर राहतो. प्रत्येक जमातीची स्वतंत्र सांस्कृतिक ओळख असली तरी निसर्गप्रेम, सामूहिक जीवन, श्रमप्रतिष्ठा, परस्पर सहकार्य आणि साधेपणा ही त्यांची समान वैशिष्ट्ये आहेत. भारतीय संस्कृतीची खरी समृद्धी ही या विविधतेतच दडलेली आहे.आदिवासी समाजाचा इतिहास हा संघर्ष, स्वाभिमान आणि स्वातंत्र्याचा इतिहास आहे. ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध सर्वप्रथम लढा उभारणाऱ्यांमध्ये अनेक आदिवासी वीरांचा समावेश होता. बिरसा मुंडा यांनी अन्यायाविरुद्ध उलगुलान चळवळ उभारून जल, जंगल आणि जमीन यांच्या संरक्षणासाठी संघर्ष केला. तिलका मांझी, सिद्धू-कान्हू, तंट्या भिल, राणी दुर्गावती, कोमाराम भीम, अल्लुरी सीताराम राजू अशा अनेक वीरांनी स्वातंत्र्यलढ्यात अतुलनीय योगदान दिले. परंतु मुख्य प्रवाहातील इतिहासात त्यांच्या कार्याची अपेक्षित दखल घेतली गेली नाही. आज जागतिक आदिवासी दिन हा त्या विस्मृतीत गेलेल्या इतिहासाचे स्मरण करून देतो आणि आदिवासी स्वातंत्र्यवीरांच्या कार्याचा अभिमानाने गौरव करण्याची संधी उपलब्ध करून देतो.आदिवासी समाजाचे जीवन हे निसर्गाशी अविभाज्यरीत्या जोडलेले आहे. जंगल, डोंगर, नद्या, झरे, वनस्पती आणि वन्यजीव हे त्यांच्या जीवनाचे अविभाज्य घटक आहेत. जंगल त्यांच्या दृष्टीने केवळ उपजीविकेचे साधन नसून ते संस्कृतीचे, श्रद्धेचे आणि अस्तित्वाचे केंद्र आहे. म्हणूनच जंगलाचे संवर्धन, जलस्रोतांचे संरक्षण, जैवविविधतेचा आदर आणि नैसर्गिक संसाधनांचा संयमी वापर ही जीवनमूल्ये त्यांनी पिढ्यान्पिढ्या जपली आहेत. आज जग हवामान बदलामुळे गंभीर संकटांचा सामना करीत असताना आदिवासी समाजाने जपलेली पर्यावरणपूरक जीवनशैली मानवजातीला नवा मार्ग दाखवित आहे. 'निसर्गावर विजय' नव्हे तर 'निसर्गासोबत सहजीवन' ही त्यांची जीवनदृष्टी आज अधिक महत्त्वाची ठरली आहे.आदिवासी समाजाकडे पारंपरिक ज्ञानाचा अमूल्य ठेवा आहे. औषधी वनस्पतींची ओळख, लोकऔषधोपचार, जलव्यवस्थापन, नैसर्गिक शेती, बीजसंवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण, हवामानाचा अचूक अंदाज आणि वनसंपत्तीचा संतुलित वापर यामध्ये त्यांचे ज्ञान विलक्षण समृद्ध आहे. अनेक आधुनिक संशोधन संस्थांनी या ज्ञानाचा अभ्यास करून त्याची वैज्ञानिक उपयुक्तता मान्य केली आहे. पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण आणि शाश्वत विकासाच्या धोरणांमध्ये आदिवासी ज्ञानाला आज जागतिक स्तरावर महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचे दस्तऐवजीकरण, संवर्धन आणि बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण ही काळाची गरज बनली आहे.भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जमातींना सामाजिक न्याय मिळावा यासाठी अनेक घटनात्मक संरक्षणे दिली आहेत. शिक्षण, नोकरी आणि लोकप्रतिनिधित्वामध्ये आरक्षण, अनुसूचित क्षेत्रांसाठी विशेष तरतुदी, पंचायत (अनुसूचित क्षेत्र विस्तार) कायदा, वनहक्क कायदा, आदिवासी उपयोजना, एकलव्य निवासी विद्यालये, आश्रमशाळा, शिष्यवृत्ती योजना आणि विविध आर्थिक विकास कार्यक्रम यांद्वारे शासन आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील आहे. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक अडथळे आहेत. वनहक्कांचे प्रलंबित दावे, विस्थापन, पायाभूत सुविधांचा अभाव, अपुरे आरोग्य, बेरोजगारी आणि आर्थिक दुर्बलता यांसारख्या समस्या अनेक आदिवासी कुटुंबांना आजही भेडसावत आहेत.शिक्षण हे कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे सर्वात प्रभावी साधन आहे. आदिवासी समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार वाढत असला तरी अनेक दुर्गम भागांमध्ये दर्जेदार शाळा, प्रशिक्षित शिक्षक, मातृभाषेत शिक्षण, डिजिटल सुविधा आणि आर्थिक मदतीचा अभाव जाणवतो. परिणामी अनेक विद्यार्थी शिक्षण अर्धवट सोडतात. आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेत प्राथमिक शिक्षण, गुणवत्तापूर्ण निवासी शाळा, डिजिटल शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि उच्च शिक्षणासाठी पुरेशा शिष्यवृत्ती उपलब्ध करून दिल्यास त्यांचा सर्वांगीण विकास अधिक प्रभावीपणे साधता येईल. शिक्षणामुळे आत्मविश्वास, नेतृत्व आणि सामाजिक परिवर्तनाची नवी ऊर्जा निर्माण होते.आरोग्याच्या क्षेत्रातही अनेक आव्हाने आहेत. कुपोषण, माता-बालमृत्यू, संसर्गजन्य आजार, स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा अभाव, आरोग्यसेवेची कमतरता आणि दुर्गम भागांतील वैद्यकीय सुविधा अपुऱ्या असल्यामुळे आदिवासी समाजाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. पोषण कार्यक्रम, मोबाईल आरोग्यसेवा, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे बळकटीकरण, सुरक्षित मातृत्व, आरोग्यविषयक जनजागृती आणि स्थानिक आरोग्य स्वयंसेवकांचे प्रशिक्षण यांद्वारे या समस्या कमी करता येऊ शकतात.आर्थिक विकासाच्या दृष्टीने आदिवासी समाजामध्ये अमर्याद क्षमता आहे. बांबू, मध, लाख, तेंदूपत्ता, औषधी वनस्पती, वनउत्पादने, सेंद्रिय शेती, हस्तकला, वारली चित्रकला, गोंड कला, ग्रामीण पर्यटन आणि वनाधारित उद्योग यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊ शकते. स्थानिक उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे, मूल्यवर्धन उद्योग उभारणे, महिला बचतगटांना प्रोत्साहन, कौशल्य विकास प्रशिक्षण आणि डिजिटल विपणनाच्या सुविधा निर्माण केल्यास आदिवासी युवक-युवती आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील. स्वावलंबन आणि स्थानिक संसाधनांवर आधारित विकास हीच खरी आर्थिक प्रगतीची दिशा आहे.आदिवासी महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शेती, वनउत्पादने संकलन, कुटुंब व्यवस्थापन, हस्तकला, लोकपरंपरा जतन आणि सामाजिक निर्णय प्रक्रियेमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. तरीही शिक्षण, आरोग्य, आर्थिक संधी आणि नेतृत्वाच्या बाबतीत त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. स्वयं-सहाय्य गट, कौशल्य प्रशिक्षण, सूक्ष्म उद्योग, आर्थिक साक्षरता आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नेतृत्व विकासाच्या माध्यमातून त्यांचे सक्षमीकरण अधिक प्रभावीपणे करता येऊ शकते.आदिवासी कला आणि संस्कृती ही भारतीय सांस्कृतिक वारशाची जिवंत परंपरा आहे. वारली चित्रकला, गोंड चित्रशैली, लोकनृत्य, पारंपरिक वाद्ये, लोकगीत, लोककथा, सण-उत्सव आणि लोकभाषा या केवळ सांस्कृतिक अभिव्यक्ती नसून त्या त्यांच्या इतिहासाच्या, जीवनमूल्यांच्या आणि तत्त्वज्ञानाच्या साक्षी आहेत. जागतिकीकरणामुळे अनेक स्थानिक भाषा आणि परंपरा लोप पावत असल्याने त्यांचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. सांस्कृतिक संशोधन, संग्रहालये, लोककला महोत्सव, शालेय अभ्यासक्रमात स्थानिक परंपरांचा समावेश आणि नव्या पिढीपर्यंत या वारशाचे हस्तांतरण ही काळाची गरज आहे.आज संयुक्त राष्ट्रसंघाने निश्चित केलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टांच्या पूर्ततेमध्ये आदिवासी समाजाची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. पर्यावरण संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण आणि हवामान बदलाशी जुळवून घेण्याच्या त्यांच्या पारंपरिक पद्धती संपूर्ण जगासाठी मार्गदर्शक ठरत आहेत. म्हणूनच आदिवासी समाजाकडे केवळ विकासाच्या लाभार्थी म्हणून नव्हे, तर विकासाचे भागीदार आणि ज्ञानाचे वाहक म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे.गेल्या काही दशकांत अनेक आदिवासी युवक-युवती शिक्षण, प्रशासन, न्यायव्यवस्था, विज्ञान, साहित्य, कला, क्रीडा, उद्योजकता आणि राजकारण या क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. त्यांच्या यशामुळे समाजात सकारात्मक बदल घडत असून नव्या पिढीमध्ये आत्मविश्वास निर्माण होत आहे. डिजिटल तंत्रज्ञान, ऑनलाइन शिक्षण, ई-व्यवसाय आणि नवउद्योजकतेच्या माध्यमातून आदिवासी समाज नव्या संधींचा लाभ घेत आहे. मात्र या विकास प्रक्रियेमध्ये त्यांची सांस्कृतिक ओळख, पारंपरिक ज्ञान आणि सामाजिक मूल्ये अबाधित राहिली पाहिजेत.जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यामागील खरी भावना म्हणजे आदिवासी समाजाला दयेचा विषय न मानता सन्मानाचा विषय मानणे होय. त्यांचे हक्क, त्यांची संस्कृती, त्यांचे ज्ञान आणि त्यांची जीवनपद्धती यांचा आदर करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. विकासाच्या प्रत्येक धोरणात आदिवासी समाजाचा सक्रिय सहभाग, त्यांच्या भूमीवरील हक्कांचे संरक्षण, गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक न्याय सुनिश्चित करणे ही काळाची गरज आहे.भारताला समृद्ध, समावेशक आणि विकसित राष्ट्र बनवायचे असेल, तर आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास हा राष्ट्रीय विकासाचा अविभाज्य भाग मानावा लागेल. जल, जंगल आणि जमीन यांचे संवर्धन, पर्यावरणपूरक जीवनशैली, सामुदायिक मूल्ये, लोकज्ञान आणि सांस्कृतिक विविधता यांचा आदर करणारा विकासच खऱ्या अर्थाने शाश्वत विकास ठरू शकतो. म्हणूनच ९ ऑगस्टचा जागतिक आदिवासी दिन हा केवळ एका समाजाचा गौरव करणारा दिवस नसून मानवता, सामाजिक न्याय, पर्यावरण संरक्षण आणि सांस्कृतिक समृद्धीचा जागतिक संदेश देणारा दिवस आहे. या दिनानिमित्त आदिवासी समाजाच्या संघर्षाला, कर्तृत्वाला आणि ज्ञानपरंपरेला कृतज्ञ अभिवादन करत त्यांच्या सन्मान, समानता आणि सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकाने कटिबद्ध होणे, हीच या दिवसाला खरी आदरांजली ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

**bagate.rajendra5@gmail.com**